महाराष्ट्र शासन
# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in
**Website:** www.jdroamt.org
**Fax No:** (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /प्रवेश/२०२४/ 3092
दिनांक :- 10 OCT 2024

**प्रति,**

**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती/यवतमाळ.
शासकीय तंत्रनिकेतन,
अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशिम/मुर्तिजापुर/अचलपुर.
डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती (अनुदानित)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी/पदवीका अभ्यासक्रमाची अतिरीक्त फेरी राबविण्याबाबत.**
**संदर्भ :-** दिनांक १०/१०/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित केलेली ऑनलाईन बैठक.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका व पदवी अभ्यासक्रमाची कट ऑफ डेट दिनांक २३/१०/२०२४ असा करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेमध्ये वरील अभ्यासक्रमामध्ये रिक्त असलेल्या जागा भरण्याचे दृष्टीने अतिरीक्त फेरी आपल्या स्तरावर राबविण्यात यावी. अतिरीक्त फेरी राबवितांना सोबत जोडलेल्या पत्रामध्ये आपल्या संस्थेसमोर नमुद दिनांकास भरण्यात यावे व त्याबाबतची जाहीरात आपल्या स्तरावर देण्यात यावी. अतिरीक्त फेरी राबविण्यात येत असतांना पदवी अभियांत्रिकीसाठी मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व पदवीक अभियांत्रिकीसाठी तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांची प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमाच्या माहीती पुस्तकेमध्ये दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करावे व त्यामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपल्या स्तरावरुन नियमानुसार प्रवेशाबाबतची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच आपल्या संस्थमध्ये रिक्त असलेल्या जागांची माहीती आपल्या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्राचार्य,** सर्व खाजगी अभियांत्रिकी पदवी/पदवीका संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी/पदवीका अभ्यासक्रमाच्या रिक्त असलेल्या जागा भरण्याबाबत अतिरीक्त फेरी राबवुन आपल्या स्तरावर जाहीरात देऊन कट ऑफ डेटच्या आत भरण्यात याव्यात. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

D:/Advertisment

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी/पदविका अभ्यासक्रमाकरीता संस्था स्तरावर दिनांकनिहाय राबवायाची अतिरीक्त फेरी.**

| अ. क्र. | संस्थेचे नांव | प्रवेश फेरीचे स्थळ | अतिरिक्त प्रवेश फेरीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती | सबंधित संस्थेत | १८/१०/२०२४ व २३/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| २ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ | सबंधित संस्थेत | २१/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ३ | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | सबंधित संस्थेत | १४/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ४ | डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | सबंधित संस्थेत | १५/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव/वाशिम | सबंधित संस्थेत | १६/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ६ | शासकीय तंत्रनिकेतन, अचलपुर | सबंधित संस्थेत | २१/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ७ | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर | सबंधित संस्थेत | २२/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ८ | अमरावती / यवतमाळ / बुलढाणा / वाशिम / अकोला जिल्हयातील खाजगी विनाअनुदानित तंत्रनिकेतने | सबंधित संस्थेत | २३/१०/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |

सदर फेरीनंतरही उर्वरित शिल्लक जागा असल्यास शासकीय/अनुदानित तंत्रनिकेतनामध्ये **दिनांक २३/१०/२०२४** रोजी अंतिम अतिरिक्त प्रवेश फेरी राबविली जाणार आहे. तरी सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशाबाबतची कार्यवाही करावी. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थेशी संपर्क साधावा. रिक्त जागांचा तपशिल व विहीत केलेले शुल्क संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर (website) उपलब्ध करुन देण्यात यावे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.